निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शनिवार
०७ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३४२ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### हिवर्डीचा 'लाल' आता लाटांवर स्वार! धीरज पंडितची भारतीय नौदलात झेप

**ग्रामीण युवकांसाठी ठरला प्रेरणास्रोत**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/ जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर ग्रामीण भागातील तरुणही आकाशाला गवसणी घालू शकतात, हे जालना तालुक्यातील हिवर्डी येथील धीरज लक्ष्मण पंडित याने सिद्ध करून दाखवले आहे. धीरजची भारतीय नौदलातनिवड झाली असून, त्याच्या या यशाने संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. हिवर्डी गावाच्या इतिहासात नौदलात जाणारा तो पहिलाच तरुण ठरला आहे.

शिक्षणाचा प्रवास: जिल्हा परिषद शाळा ते नौदल

धीरजचा हा प्रवास सोपा नव्हता. त्याचे प्राथमिक शिक्षण हिवर्डी येथील जिल्हा परिषद शाळेत १ ली ते ७ वी पर्यंत झाले. त्यानंतर माध्यमिक शिक्षणासाठी त्याने नेर येथील अभिजीत विद्यालयात प्रवेश घेतला. १० वी नंतर त्याने सैन्यदलात भरती होण्याचे ध्येय निश्चित केले होते.

छत्रपती संभाजीनगरमध्ये खडतर सराव

आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी धीरजने छत्रपती संभाजीनगर येथील भारत करिअर अकॅडमीत प्रवेश घेतला. येथे त्याने केवळ शारीरिक तंदुरुस्तीच नव्हे, तर लेखी परीक्षा आणि मुलाखतीसाठीही स्वतःला झोकून दिले.

**शिस्तबद्ध दिनचर्या:** पहाटेचा सराव आणि रात्री उशिरापर्यंत अभ्यास हे त्याचे सूत्र होते.

**मानसिक तयारी:** सैन्यदलातील कठीण आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्याने स्वतःला मानसिकदृष्ट्या सक्षम बनवले.

**सातत्य:** अपयशाची भीती न बाळगता त्याने आपल्या प्रयत्नात सातत्य ठेवले.

धीरजच्या निवडीची बातमी गावात समजताच ग्रामस्थांनी एकच जल्लोष केला. आमच्या गावचा मुलगा आता देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करणार, याचा सार्थ अभिमान वाटतो, अशा भावना हिवर्डीकरांनी व्यक्त केल्या. त्याचे शिक्षक, मित्र आणि नातेवाईकांनी त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्षमता असते, फक्त त्यांना योग्य मार्गदर्शन आणि संधीची गरज असते. धीरजने हे यश मिळवून इतर मुलांसाठी एक नवा मार्ग खुला केला आहे. –

**हिवर्डी ग्रामस्थ**

धीरज पंडितची ही यशोगाथा सांगते की, तुमची पार्श्वभूमी काय आहे यापेक्षा तुमचे ध्येय किती मोठे आहे, हे महत्त्वाचे असते. योग्य नियोजन, स्वतःवरचा विश्वास आणि प्रामाणिक कष्ट असतील तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही.

### 'काँग्रेस खासदारांचे वर्तन संसदेच्या परंपरेला काळीमा फासणारे'; भाजपाचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांचे टीकास्त्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/संसदेच्या समृद्ध परंपरेला आणि लोकशाही मूल्यांना हरताळ फासण्याचे काम काँग्रेस खासदारांनी केले असून, त्यांचे वर्तन देशाच्या इतिहासातील काळा अध्याय आहे, अशा शब्दांत भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी शुक्रवारी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी काँग्रेससह 'उबाठा' गट आणि संजय राऊत यांच्यावर बोचरी टीका केली.

संसदेत पंतप्रधानांच्या सुरक्षेचा प्रश्न

नवनाथ बन म्हणाले की, देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी दुर्दैवी घटना घडली, जिथे लोकसभेत देशाच्या पंतप्रधानांना भाषण देण्यासाठी सुरक्षित वातावरण नव्हते. लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याऐवजी काँग्रेस खासदारांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आसनासमोर जाऊन गोंधळ घातला. हे वर्तन केवळ असंसदीय नसून पंतप्रधानांच्या जीवाला धोका निर्माण करणारे होते. या घटनेचा भाजपा तीव्र शब्दांत निषेध करते.

उबाठा गट आणि राऊतांवर निशाणा

काँग्रेसच्या या वर्तनाचे समर्थन करणाऱ्या संजय राऊत आणि उबाठा गटावर टीका करताना बन म्हणाले की, विरोधकांनी नेहमीच मोदी द्वेषाचे राजकारण केले आहे. 'मौत का सौदागर' पासून 'मोदी तेरी कब्र खुदेगी' पर्यंतच्या हीन दर्जाच्या घोषणा देऊन त्यांनी आपली पातळी ओलांडली आहे. बिहार निवडणुकीदरम्यान पंतप्रधानांच्या मातोश्रींबद्दल केलेले वक्तव्य त्यांच्या मानसिकतेचे दर्शन घडवते.

उद्धव ठाकरे घरात बसून होते, मोदी जनतेसाठी झटत आहेत

मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत नवनाथ बन यांनी त्यांना 'डरपोक' संबोधले. ते म्हणाले:कोविड काळ: जेव्हा जनता मरणाच्या दारात होती, तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री अडीच वर्षे घरात बसून होते.

जबाबदारीतून पळ: जनतेच्या रक्षणाची जबाबदारी असताना उद्धव ठाकरे जबाबदारी झटकून घरात लपले होते.

राऊतांची पात्रता: संजय राऊत यांनी खासदार निधीतून एकही लोकहिताचे काम केलेले नाही. सलग तीन वेळा निवडून आलेल्या पंतप्रधानांवर टीका करण्याची त्यांची पात्रता नाही.

'पाटकर फाईल'वरून इशारा

संजय राऊत यांनी 'एपस्टीन फाईल'वर बोलण्याऐवजी स्वतःच्या चुकांकडे लक्ष द्यावे, असा इशारा देत बन म्हणाले, जर आम्ही 'पाटकर फाईल' उघडली, तर राऊतांना तोंड दाखवायला जागा उरणार नाही. माता-भगिनींना कशा प्रकारे त्रास दिला गेला, याचे सत्य त्यातून बाहेर येईल.

संजय राऊत हे राहुल गांधी आणि शरद पवार यांच्या स्तुतीत मग्न असतात, मात्र ज्यांच्या पक्षात आहेत त्या उद्धव ठाकरेंचे कौतुक करताना दिसत नाहीत. ज्यांचे मीठ खाता, किमान त्यांच्याशी तरी इमान राखा, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

थोडक्यात ठळक मुद्दे:

पंतप्रधानांच्या भाषणात अडथळा आणणे हा लोकशाहीचा अपमान.

भारत-अमेरिका व्यापार कराराने अर्थव्यवस्था उंचावत असताना राऊत मात्र पाकिस्तानची तळी उचलत आहेत.भारताची बदनामी करणाऱ्यांना भाजपा चोख प्रत्युत्तर देणार

# इंग्लंडचा धुव्वा उडवत भारताने सहाव्यांदा कोरलं विश्वचषकावर नाव!

**आत्ताच एक्सप्रेस**

**हरार/झिम्बाब्वे/वृत्तसेवा**/भारतीय युवा ब्रिगेडने पुन्हा एकदा सिद्ध केलंय की क्रिकेटच्या मैदानावर भारताचाच दबदबा आहे! आयसीसी पुरुष १९ वर्षांखालील विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडच्या चिंधड्या उडवत तब्बल १०० धावांनी ऐतिहासिक विजय मिळवला. या विजयासह भारताने सहाव्यांदा विश्वविजेतेपदाच्या करंडकावर आपलं नाव कोरून इतिहास रचला आहे.



**वैभव सूर्यवंशीचा 'विराट' अवतार: ८० चेंडूत १७५ धावांचा पाऊस!**

अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजीला उतरलेल्या भारतीय संघाचा सलामीवीर वैभव सूर्यवंशी याने मैदानावर अक्षरशः नंगा नाच केला. वैभवने इंग्लंडच्या एकाही गोलंदाजाची दया माया ठेवली नाही. त्याने अवघ्या ३२ चेंडूत अर्धशतक, ५५ चेंडूत शतक आणि फक्त ७१ चेंडूत १५० धावांचा टप्पा ओलांडला.वैभवने ८० चेंडूंच्या खेळीत १५ चौकार आणि १५ उत्तुंग षटकार ठोकले. २१८.७५ च्या स्ट्राईक रेटने त्याने १७५ धावा कुटल्या आणि भारताला ४१२ धावांचा हिमालय उभा करून दिला. या खेळीने इंग्लंडचे मानसिक खच्चीकरण केलं.

कर्णधार आयुष म्हात्रेची 'कॅप्टन्सी' खेळी सुरुवातीला आरोन जॉर्ज (९ धावा) स्वस्तात बाद झाल्यावर कर्णधार आयुष म्हात्रेने अत्यंत संयमी खेळ केला. त्याने ५१ चेंडूत ५३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करून वैभवला मोठी फटकेबाजी करण्यासाठी भक्कम साथ दिली. त्यानंतर विहान मल्होत्रा (३०), वेदांत त्रिवेदी (३२) आणि अभिज्ञान कुंडूच्या आक्रमक ४० धावांच्या जोरावर भारताने निर्धारित षटकात धावांचा डोंगर उभा केला.

**भारताचा विश्वविजेतेपदाचा प्रवास:**

२०००: मोहम्मद कैफ (कर्णधार)
२००८: विराट कोहली (कर्णधार)
२०१२: उन्मुक्त चंद (कर्णधार)
२०१८: पृथ्वी शॉ (कर्णधार)
२०२२: यश धुल (कर्णधार)
२०२६: आयुष म्हात्रे (कर्णधार)

**इंग्लंडचा प्रतिकार अपुरा; भारतीय गोलंदाजांसमोर नांग्या टाकल्या**

४१३ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात भारतीय गोलंदाजांनी खराब केली. कॅलेब फॉकनरने ६७ चेंडूत ११५ धावांची झंझावाती खेळी करून भारताला उत्तर देण्याचा प्रयत्न केला खरा, पण भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर इंग्लंडचा डाव ४०.२ षटकांत ३११ धावांवर आटोपला.

हा विजय आमच्या मेहनतीचे फळ आहे. वैभवची खेळी अविश्वसनीय होती आणि गोलंदाजांनी मोक्याच्या क्षणी विकेट्स काढल्या. आम्ही पुन्हा एकदा दाखवून दिले की भारत का विश्वविजेता आहे!

**- कर्णधार आयुष म्हात्रे**

### सावधान! ऊस वजनात काटामारी झाल्यास गय नाही

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/ राज्यात सन २०२५-२६ चा साखर गाळप हंगाम रंगात आला असून, शेतकऱ्यांच्या कष्टाच्या उसाला योग्य वजन मिळावे यासाठी वैध मापनशास्त्र विभाग क्शन मोडमध्ये आला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व साखर कारखान्यांच्या वजन काट्यांची पडताळणी पूर्ण झाली असून, जर कुठेही तफावत आढळली तर थेट कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.प्रशासनाचा 'स्पेशल स्कॉड' तैनातशेतकऱ्यांची ऊस वजनात फसवणूक होऊ नये, यासाठी जिल्हास्तरावर 'विशेष भरारी पथकांची' स्थापना करण्यात आली आहे. सह नियंत्रक सु.ह. चाटे यांनी स्पष्ट केले आहे की, साखर कारखान्यांमधील काट्यांची केवळ कागदोपत्री पडताळणी झाली नसून, प्रत्यक्ष जागेवर जाऊन

**साखर कारखान्याच्या वजन काट्यांवर प्रशासनाची करडी नजर**



निरीक्षकांमार्फत मुद्रांकन (Stamping) करण्यात आले आहे. ही पथके आता नियमितपणे कारखान्यांच्या काट्यांची अचानक तपासणी करत आहेत.शेतकऱ्यांनो, 'असा' करा आपला हक्क शाबूत!विभागीय प्रशासनाने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, केवळ कारखान्याच्या वजनावर अवलंबून राहू नका. जर तुम्हाला वजनाबाबत शंका असेल, तर खालील पावले उचला:बाहेर वजन करा: कारखान्यात जाण्यापूर्वी आपल्या उसाच्या वाहनाचे वजन बाहेरच्या अधिकृत 'धर्मकाट्यावर' (Public Weighbridge) करून घ्या.पावती जपून ठेवा: बाहेरील वजन काट्याची रितसर पावती आपल्याकडे ठेवा.तफावत तपासा: जर बाहेरील वजन आणि कारखान्यातील वजन यात तफावत आढळली, तर गप्प न बसता तात्काळ तक्रार करा.तक्रार कोठे कराल? (संपर्क क्रमांक) वजनात घोळ आढळल्यास शेतकऱ्यांनी खालील क्रमांकांवर थेट संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.अधिकारी व जिल्हापदसंपर्क क्रमांक सु.ह.चाटे (विभागीय कार्यालय) सह नियंत्रक-९४२०६९९०११ / ०२४०-२९५२६५६ शि.ये. मुंढे (छत्रपती संभाजीनगर) उप नियंत्रक८२०८८६१२७० / ०२४०-२४८३८१८गं.मा. कांबळे (बीड) उप नियंत्रक-९०६७१४६८८४ / ०२४४२-२२२४१७ र.धो. दराडे (जालना) उप नियंत्रक ९४२१४३९९९९ / ०२४८२- २२०७४३ गं.मा. कांबळे (परभणी) उप नियंत्रक ९०६७१४६८८४ / ०२४५२-२२१२५८ आ.आ. कुलकर्णी (नांदेड, लातूर, धाराशिव) उप नियंत्रक ९३२५७०२५६९ / ०२४६२-२३३८८१ प्रशासनाचा इशारा: शेतकऱ्यांच्या घामाच्या घासावर डल्ला मारणाऱ्यांची आता खैर नाही.कोणत्याही साखर कारखान्याने वजनात फेरफार करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# जालन्यात भ्रष्टाचाराचा महास्फोट!

## आनंदगावच्या सरपंच-ग्रामसेवकाची 'मिलीभगत'; उपसरपंचाचे जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/लोकशाहीत ग्रामपंचायत हे विकासाचे केंद्र मानले जाते, मात्र जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील आनंदगाव येथे याच केंद्राला भ्रष्टाचाराचा अड्डा बनवण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. ग्रामसेवक आणि सरपंच यांनी संगनमत करून शासनाचा लाखो रुपयांचा निधी स्वतःच्या खिशात घातल्याचा आरोप करत, गावच्या उपसरपंचांनी थेट जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण पुकारले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आनंदगाव (ता. परतूर) येथील ग्रामपंचायतीमध्ये गेल्या काही काळापासून मोठ्या प्रमाणावर विकासकामांच्या नावाखाली आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे समोर आले आहे. ग्रामसेवक आणि सरपंचांनी संगनमत करून कागदोपत्री कामे दाखवून किंवा निकृष्ट दर्जाची कामे करून शासनाचा पैसा हडप केल्याचा गंभीर आरोप उपसरपंचांनी केला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने अखेर उपसरपंचांना न्यायासाठी उपोषणाचे हत्यार उपसावे लागले आहे.

### शासकीय निधीवर डल्ला?

उपोषणकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, सामान्य जनतेच्या कल्याणासाठी येणारा पैसा विकासकामांत खर्च न करता तो स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी वापरण्यात आला आहे. शासनाचा पैसा म्हणजे काय यांची खाजगी मालमत्ता आहे का? असा संतप्त सवाल आता ग्रामस्थांकडून विचारला जात आहे.

**प्रशासकीय सुस्तपणावर संताप**

जिल्हा परिषदेसमोर सुरू असलेल्या या उपोषणामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. एकीकडे पारदर्शक कारभाराच्या गप्पा मारल्या जात असताना, दुसरीकडे लोकप्रतिनिधीलाच भ्रष्टाचाराविरुद्ध रस्त्यावर उतरावे लागत आहे, हे प्रशासनाचे मोठे अपयश मानले जात आहे.आनंदगाव ग्रामपंचायतीमधील सर्व विकासकामांची तातडीने उच्चस्तरीय चौकशी व्हावी.भ्रष्ट सरपंच आणि ग्रामसेवकावर तात्काळ निलंबनाची कारवाई करून गुन्हे दाखल करावेत.

हडप केलेला शासकीय निधी सरकारी तिजोरीत पुन्हा जमा करावा.जोपर्यंत भ्रष्टाचाऱ्यांवर कडक कारवाई होत नाही आणि गावाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत हे उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा इशारा उपसरपंचांनी दिला आहे.आता या प्रकरणावर जिल्हा परिषद प्रशासन काय भूमिका घेते आणि या 'भ्रष्ट युती'वर काय कारवाई होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.




### यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षान्त सोहळा उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक/प्रतिनिधी**/यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षान्त सोहळा नुकताच विद्यापीठ आवारात मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात १,२३,९२१ विद्यार्थ्यांना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. निर्मलजित सिंह कलसी उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी भूषवले.ग्लोबल मॉडेल: डॉ. कलसी यांनी विद्यापीठाचा उल्लेख 'फ्युचर ऑफ लर्निंग' आणि 'ग्लोबल मॉडेल' असा केला.यंदा प्रथमच ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित क्यूआर कोड असलेली प्रमाणपत्रे देण्यात आली, ज्याची वैधता कोठूनही तपासता येईल.पदवीधारकांमध्ये ६० वर्षांवरील २०८ विद्यार्थी, ७७ दृष्टिबाधित आणि ६८ कारागृहातील बंदीजनांचा समावेश होता.

# अंबडमध्ये वाळू माफियांचा धुमाकूळ: महिला तलाठ्याला चिरडण्याचा प्रयत्न; १३ जणांवर गुन्हे दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी** / जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात वाळू माफियांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, कारवाईसाठी गेलेल्या एका महिला महसूल अधिकाऱ्याला चक्क ट्रॅक्टरखाली चिरडून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुकना नदीपात्रात (आवा/अंतरवाला परिसर) रात्रीच्या अंधारात सुरू असलेल्या या अवैध वाळू उपशावर प्रशासनाने आता सर्जिकल स्ट्राईक केला असून, १३ जणांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सुकना नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळूची चोरी होत असल्याच्या तक्रारी तहसीलदार कार्यालयाला प्राप्त झाल्या होत्या. या माहितीच्या आधारे सजा आलमगावच्या महिला तलाठी मीरा सखाराम कोल्हे या आपल्या पथकासह रात्रीच्या वेळी सुकना नदीपात्रात कारवाईसाठी पोहचल्या. पथकाला पाहताच वाळू माफियांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे, तर कर्तव्यावर असलेल्या महिला तलाठी कोल्हे यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न मुजोर माफियांनी केला. सुदैवाने, या हल्ल्यातून त्या बालंबाल बचावल्या.

वाळू माफियांनी महिला अधिकाऱ्यावर हल्ला करून आपली हद्द पार केली आहे. आता केवळ गुन्हे दाखल करून आम्ही थांबणार नाही. तालुक्यातील सर्व अवैध उत्खनन केंद्रांची गोपनीय माहिती संकलित करण्यात आली असून, लवकरच मोठे छापे टाकले जातील. सराईत गुन्हेगारांवर तडीपारी, एमपीडीए (MPDA) आणि मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव पाठवण्यात येत आहे.

**- विजय चव्हाण, तहसीलदार, अंबड.**

वाळू उपसा करणाऱ्यांचे 'खबरी' प्रशासनाच्या हालचालींवर पाळत ठेवून असायचे, ज्यामुळे अनेकदा कारवाई निष्फळ ठरत होती. ही साखळी तोडण्यासाठी अंबडचे तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने सापळा रचला. या मोहिमेत केवळ वाळू चोरच नाही, तर त्यांना टीप देणाऱ्या ५ खबऱ्यांच्या मुसक्याही आवळण्यात आल्या आहेत.



**१३ जणांवर गुन्हे, ४.५ लाखांचा मुद्देमाल जप्त**

अंबड पोलीस ठाण्यात दाखल एफ.आय.आर. (क्र. ००६४/२०२६) नुसार, भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत एकूण १३ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात ८ ट्रॅक्टर मालक/चालक आणि ५ खबऱ्यांचा समावेश आहे.

या कारवाईत सुमारे ९० ब्रास वाळू (किंमत अंदाजे ४,५०,००० रुपये) चोरीला गेल्याचे उघड झाले आहे.

वाळू चोरी करणारे: कल्याण खडके, दत्ता साकळकर, जमील शेख, गणेश दसपुते, संभाजी भागवत, मदन चोपडे, आकाश शिंदे, पवन शिंदे, खबरी (पाळत ठेवणारे): विकास खंडागळे, अंकुश खंडागळे, बाळासाहेब दसपुते, सचिन साकळकर, सोहेल शेख ही धडक कारवाई जिल्हाधिकारी आशीमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या धाडसी कारवाईत तलाठी मीरा कोल्हे, मंडळ अधिकारी विलास राजपूत व त्यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार आर.आर. हरकाळ करत आहेत.

प्रशासनाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे वाळू माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

# निष्ठेपेक्षा 'विकास' मोठा की ही सत्तेची गणिते?

**अमरावती महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीने राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा एका जुन्या वादाला तोंड फोडले आहे: 'पक्षशिस्त महत्त्वाची की वैयक्तिक मत?' एमआयएमच्या नगरसेविका मीराबाई कांबळे यांनी पक्षाचा 'व्हीप' झुगारून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला दिलेले मत हे केवळ एका मताचे गणित नसून, ते स्थानिक राजकारणातील बदलत्या समीकरणांचे निदर्शक आहे.**

**एमआयएम आणि भाजप हे दोन्ही पक्ष वैचारिकदृष्ट्या उत्तर आणि दक्षिण ध्रुवासारखे मानले जातात. अशा परिस्थितीत एमआयएमच्या नगरसेविकेने थेट भाजपला मतदान करणे, हे गटनेत्यांसाठी धक्कादायक असणे स्वाभाविक आहे. उमेदवार काम करणारा आणि विकास करणारा वाटला, असे समर्थन मीराबाई कांबळे यांनी दिले असले, तरी राजकारणात अशा उघड बंडामागे केवळ 'विकास' असतो की पडद्यामागील काही वेगळी 'जुळवाजुळव', हा प्रश्न जनतेच्या मनात कायम राहतो.**

**आकडेवारीचा पेच आणि 'किंगमेकर'ची भूमिका**

**अमरावतीचा निकाल पाहता कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही.**

**भाजप: २५ जागा (बहुमतासाठी ४४ ची गरज),युवा स्वाभिमान व काँग्रेस: प्रत्येकी १५ जागा,एमआयएम: १२ जागा,राष्ट्रवादी (अजित पवार): ११ जागा, भाजपला सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठी अद्यापही मोठ्या आकड्याची गरज आहे. अशा वेळी बसपा, शिवसेना (दोन्ही गट) आणि अपक्ष नगरसेवक 'किंगमेकर'च्या भूमिकेत आले आहेत. मात्र, एमआयएमसारख्या पक्षातून फुटणारे मत हे भाजपसाठी नैतिक विजयापेक्षा संख्याबळाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे ठरले आहे.**

**गटनेत्यांनी कांबळे यांच्यावर हकालपट्टीची कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. परंतु, पक्षाने कारवाई केली तर मार्ग भरपूर आहेत, असे म्हणत त्यांनी पुढच्या संघर्षाची तयारीच दर्शवली आहे. हे विधान महाराष्ट्रातील सध्याच्या 'फोडाफोडीच्या' राजकारणाला साजेसे आहे. जेव्हा लोकशाहीत पक्षादेशापेक्षा वैयक्तिक महत्त्वाकांक्षा वरचढ ठरतात, तेव्हा मतदारांच्या विश्वासाचे काय, हा मूळ प्रश्न अनुत्तरित राहतो.**

**अमरावतीचा हा 'ट्विस्ट' केवळ एका महापौराची निवड करणार नाही, तर भविष्यातील नव्या युती आणि आघाड्यांची नांदी ठरू शकतो. विचारधारा बाजूला सारून सत्तेसाठी होणारी ही ओढाताण शेवटी शहराच्या विकासासाठी फलदायी ठरते की केवळ राजकीय सोयीसाठी, हे येणारा काळच ठरवेल. तूर्तास, अमरावतीच्या या राजकीय नाट्याने राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे, हे मात्र नक्की.**

## ५ लाख ग्राहकांचा 'ऑनलाईन' वीजबिल भरण्याकडे कल

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** बदलत्या काळानुसार महावितरणचे ग्राहक आता 'टेक्नोसेव्ही' होत असल्याचे चित्र छत्रपती संभाजीनगर परिमंडलात पाहायला मिळत आहे. परिमंडलातील तब्बल ४ लाख ९२ हजार ८५६ ग्राहकांनी घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने वीजबिल भरण्याला पसंती दिली आहे. विशेष म्हणजे, या डिजिटल क्रांतीमुळे ग्राहकांचा वेळ तर वाचत आहेच, पण त्यांना विविध सवलतींच्या माध्यमातून आर्थिक लाभही मिळत आहे.

एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या १० महिन्यांच्या कालावधीत परिमंडलातील ग्राहकांनी ऑनलाईन माध्यमांतून १३०० कोटी ८६ लाख रुपयांचा वीज भरणा केला आहे. महावितरणचे मोबाईल प आणि संकेतस्थळाच्या सुलभ वापरामुळे हा टप्पा गाठणे शक्य झाले आहे.ऑनलाईन पेमेंटचे फायदे:१. ०.२५ टक्के सवलत: ऑनलाईन वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना बिलाच्या एकूण रकमेवर ०.२५ टक्के सवलत दिली जाते. २. मोफत सेवा: क्रेडिट कार्ड वगळता नेट बँकिंग, डेबिट कार्ड किंवा युपीआय द्वारे पैसे भरल्यास कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जात नाही. ३. झटपट पावती: बिल भरल्यानंतर लगेचच नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएस (डचड) द्वारे पोच मिळते. तसेच वेबसाइटवर मागील देयकांचा इतिहास पाहण्याची सोय आहे.४.मोठ्या रकमांसाठी सुविधा: ५ हजार रुपयांपेक्षा जास्त बिल असल्यास आरटीजीएस किंवा एनईएफटी चा पर्यायही उपलब्ध आहे.पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी महावितरणने 'गो-ग्रीन' मोहीम हाती घेतली आहे. जे ग्राहक छापील कागदी बिल नाकारून केवळ ई-मेलद्वारे बिल स्वीकारतात, त्यांना महावितरणकडून वार्षिक १२० रुपये सवलत दिली जाते.प्रक्रिया: पहिल्यांदा ऑनलाईन बिल भरताना स्क्रीनवर 'गो-ग्रीन'चा पॉप-अप दिसतो. तिथे नोंदणी केल्यास ही सवलत लागू होते.प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंट: ई-मेलवर बिल लवकर प्राप्त होत असल्याने, ग्राहकाने ते वेळेत भरल्यास अतिरिक्त १ टक्का सवलतही मिळवता येते.डिजिटल पेमेंटमुळे ग्राहकांचा वेळ आणि श्रम वाचतात.

# रमाबाई आंबेडकरांचे सामाजिक परिवर्तनाच्या पायाभरणीतील योगदान- डॉ. राजेंद्र बगाटे

७ फेब्रुवारी हा दिवस भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत अर्थपूर्ण, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरतो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसाथी, त्यागमूर्ती, संघर्षशील आणि मौनात राहूनही सामाजिक क्रांतीची मशाल पेटती ठेवणाऱ्या रमाबाई भिमराव आंबेडकर यांचा जयंती दिन होय. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, सामाजिक अन्याय, स्त्रीदमन, आर्थिक दारिद्र्य आणि मानसिक गुलामगिरीच्या पार्श्वभूमीवर रमाबाईंचे जीवन केवळ एका महापुरुषाच्या पत्नीचे जीवन नव्हते. ते जीवन एका स्वतंत्र सामाजिक योद्ध्याचे, अपार सहनशीलतेचे, निःस्वार्थ त्यागाचे आणि मौनातून घडलेल्या क्रांतीचे जिवंत प्रतीक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, शैक्षणिक आणि राजकीय संघर्षामागे रमाबाईंच्या कष्टांची, वेदनांची आणि शांत पाठबळाची भक्कम भिंत उभी होती, हे वास्तव समजून घेतल्याशिवाय आंबेडकरी चळवळीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म अत्यंत साध्या, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या वंचित परिस्थितीत झाला. त्या काळातील दलित समाजाचे जीवन म्हणजे अपमान, अस्पृश्यता, दारिद्र्य, बहिष्कार आणि सततची असुरक्षितता यांचा संगम होता. स्त्री म्हणून जन्माला येणे म्हणजे दुहेरी अन्याय सहन करणे, हीच त्या समाजाची वास्तवता होती.

शिक्षण, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, आरोग्य आणि आत्मसन्मान या मूलभूत हक्कांपासून स्त्रीला वंचित ठेवणारी सामाजिक रचना रमाबाईंच्या आयुष्यावरही खोलवर परिणाम करत होती. बालपणापासूनच कष्ट, काम, जबाबदाऱ्या आणि मौनातील सहनशीलता हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. लहान वयातच जीवनातील कठोर वास्तव स्वीकारावे लागल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमी, सहनशील आणि आत्मसंयमी बनले.

अत्यंत लहान वयात रमाबाईंचा विवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील कौटुंबिक नाते नव्हते, तर तो एका व्यापक सामाजिक संघर्षाचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य शिक्षण, विचार, आंदोलन, संघर्ष आणि सामाजिक विरोधाने भरलेले होते. या संघर्षांचा भार रमाबाईंनाही समानतेने पेलावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि समाजसुधारणेसाठी सातत्याने व्यग्र असताना रमाबाई घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखत होत्या. संसार सांभाळताना त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, उलट त्या ध्येयांवर त्यांनी अढळ विश्वास ठेवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण भारताबाहेर सुरू असताना रमाबाईंवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. आर्थिक टंचाई, अन्न-वस्त्राचा अभाव, आजारपण, सामाजिक उपेक्षा आणि मानसिक ताण हे त्यांचे रोजचे वास्तव होते.

अनेक वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागले, साध्या वस्त्रांवर समाधान मानावे लागले. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हीच त्यांची ठाम भूमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचनी मिळवलेले ज्ञान हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे, याची रमाबाईंना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या वेदनांवर मौन धारण करून सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाला बळ दिले.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील सर्वांत वेदनादायी आणि हृदयद्रावक अध्याय म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन होय. मातृत्वाचा आनंद अनुभवण्याआधीच त्यांना असह्य दुःख सहन करावे लागले. एका मागोमाग एक अपत्य गमावणे ही कोणत्याही आईसाठी अकल्पनीय वेदना असते. रमाबाईंच्या आयुष्यात ही वेदना वारंवार आली. तरीही त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून समाजासाठी झटणाऱ्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच त्यांनी आपले जीवनधर्म मानले. रमाबाईंचा हा त्याग भारतीय स्त्रीच्या सहनशीलतेचा, मानसिक बळाचा आणि निस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च नमुना आहे.

रमाबाई आंबेडकर या जरी प्रत्यक्ष सामाजिक आंदोलनांच्या मंचावर दिसत नसल्या, तरी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, मूलभूत आणि निर्णायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्थैर्य देणारे, त्यांच्या संघर्षाला मानसिक आधार देणारे आणि त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळात खंबीरपणे साथ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या. अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, धर्मांतर चळवळ आणि भारतीय संविधाननिर्मिती यांसारख्या ऐतिहासिक कार्यांसाठी बाबासाहेबांना जे मानसिक बळ आवश्यक होते, ते रमाबाईंच्या निस्वार्थ त्यागातून मिळाले.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत, संयमी आणि आत्मसन्मानाने भरलेले होते. प्रसिद्धी, सन्मान, मान्यता किंवा सार्वजनिक गौरवाची अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली नाही. समाजाने अनेकदा त्यांच्याकडे केवळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी' म्हणून पाहिले, परंतु प्रत्यक्षात त्या एका स्वतंत्र विचारसरणीच्या, मूल्यनिष्ठ आणि आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री होत्या. अपमान, दुर्लक्ष, अवहेलना आणि कष्ट सहन करूनही त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे मौन हे कमजोरीचे नव्हे, तर अंतर्गत शक्तीचे, संयमाचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक होते.

भारतीय समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चेत रमाबाई आंबेडकर यांचे जीवन अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्त्रीवादावर भाषणे केली नाहीत, लेखन केले नाही, परंतु त्यांच्या जीवनाने स्त्रीच्या सामाजिक भूमिकेची नवी व्याख्या केली. शिक्षणापासून वंचित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक ध्येयांना त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून ती सामाजिक परिवर्तनाची शांत पण प्रभावी वाहक असते.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील दारिद्र्य हे केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक अन्यायाचे आणि संरचनात्मक विषमतेचे प्रतीक होते. जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि स्त्री म्हणून दुय्यम स्थान या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर झाला. तरीही त्यांनी परिस्थितीला दोष देत बसण्याऐवजी आशेचा मार्ग स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर, मूल्यांवर आणि ध्येयांवर ठेवलेला विश्वास हेच त्यांच्या जगण्याचे बळ होते. त्यांच्या जीवनातून हे अधोरेखित होते की सामाजिक परिवर्तनासाठी फक्त पुढे उभे राहणारे नेतेच नव्हे, तर मागे उभे राहून आधार देणारे व्यक्तिमत्त्वही तितकेच महत्त्वाचे असते.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन स्त्रीवादाचा अप्रत्यक्ष पण प्रभावी आधारस्तंभ आहे. त्यांनी शब्दांतून स्त्रीवाद मांडला नाही, परंतु त्यांच्या जीवनप्रवासाने स्त्रीच्या दुहेरी संघर्षाचे वास्तव जगासमोर ठेवले. जातीय अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्था या दोन्हींचा सामना करत त्यांनी आपले जीवन जगले.

आजच्या स्त्री-अभ्यासात रमाबाईंच्या जीवनाकडे केवळ सहनशीलतेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्त्री म्हणून पाहिले जाणे आवश्यक आहे.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे स्मरण केवळ औपचारिक जयंतीपुरते मर्यादित राहू नये.

त्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना स्त्री-संघर्ष, दलित प्रश्न, कुटुंबातील त्याग, मानसिक सहनशीलता, भावनिक श्रम आणि सामाजिक परिवर्तनातील अदृश्य योगदान या सर्व पैलूंवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. रमाबाईंच्या जीवनकथेचा समावेश शिक्षणक्रमात, सामाजिक चर्चेत, स्त्री-अभ्यासात आणि दलित साहित्याच्या अभ्यासात होणे ही काळाची गरज आहे.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजाच्या वास्तवाचे आरसेपण आहे. त्या समाजाच्या कडेला उभ्या राहिलेल्या, पण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्त्रीचे प्रतीक आहेत. त्यांनी कधीही स्वतःसाठी इतिहास लिहिला नाही, परंतु त्यांच्या त्यागाने इतिहास घडविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यामागील अदृश्य शक्ती म्हणून रमाबाईंचे स्थान अढळ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या मूल्यांना आत्मसात करणे, हेच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य ठरेल.

रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आजच्या सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे. स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी मूल्यांची जोपासना, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी रमाबाईंचे जीवन मार्गदर्शक ठरते.

त्यांचे मौन आजही आपल्याशी बोलते, त्यांचा त्याग आजही समाजाला प्रश्न विचारतो आणि त्यांचे जीवन आजही परिवर्तनाची प्रेरणा देते. म्हणूनच रमाबाई भिमराव आंबेडकर या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या विचारांची अखंड साक्ष आहेत.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## संमतीने असलेल्या संबंधांत बलात्काराचा गुन्हा अयोग्य

### अलाहाबाद उच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निकाल

अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका तरुणाची जन्मठेपेची शिक्षा रद्द करताना अत्यंत महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत. न्यायालयाने म्हटले आहे की, जेव्हा दोन सज्ञान व्यक्ती संमतीने शारीरिक संबंध प्रस्थापित करतात, तेव्हा संबंध बिघडल्यानंतर त्याला बलात्काराचे स्वरूप देणे कायद्याच्या दृष्टीने अयोग्य आहे.

चंद्रेश नावाच्या तरुणावर एका मुलीचे अपहरण करून तिला लग्नाचे आमिष दाखवून बंगळूरला नेल्याचा आणि तिथे तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप होता. सत्र न्यायालयाने या प्रकरणात त्याला:

पॉक्सो कायदा

अनुसूचीत जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा

अपहरण आणि मारहाण,या कलमांखाली दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयाने हा निकाल बाजूला सारला.,उच्च न्यायालयाची महत्त्वाची निरीक्षणे,न्यायमूर्तींच्या खंडपीठाने पुराव्यांचे विश्लेषण करताना खालील मुद्दे अधोरेखित केले:

१. पीडितेचे वय: वैद्यकीय अहवालानुसार, घटनेच्या वेळी पीडितेचे वय सुमारे २० वर्षे (सज्ञान) होते. सत्र न्यायालयाने या महत्त्वाच्या पुराव्याकडे दुर्लक्ष केल्याचे उच्च न्यायालयाने नमूद केले. २. स्वेच्छेने प्रवास: पीडिता आरोपीसोबत सार्वजनिक बस आणि रेल्वेने प्रवास करून बंगळूरला गेली होती. प्रवासादरम्यान तिने मदतीसाठी कोणताही आरडाओरडा केला नाही, यावरून ती स्वतःच्या इच्छेने गेल्याचे स्पष्ट होते. ३. सहा महिन्यांचे वास्तव्य: दोघेही बंगळूरमध्ये सहा महिने एकत्र राहिले. हे संबंध पूर्णपणे संमतीने होते, असे न्यायालयाने मानले. ४. पाश्चात्य प्रभाव आणि लिव्ह-इन: न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदवले की, सध्याच्या काळात पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे तरुणांमध्ये लिव्ह-इनमध्ये राहण्याची प्रवृत्ती वाढली आहे. हे कायदे जुन्या काळातील सामाजिक परिस्थितीनुसार बनलेले आहेत, त्यामुळे त्यांचा वापर पुरुषांना चुकीच्या पद्धतीने अडकवण्यासाठी केला जाऊ नये.

तज्ज्ञांचे मत: कायद्याचा दुरुपयोग थांबवण्यासाठी पाऊल

या निकालाचे कायदेतज्ज्ञांकडून स्वागत होत आहे. ड. महेश धनावत (कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन) यांच्या मते.हा निकाल स्वागतार्ह आहे. अनेकदा लिव्ह-इन संबंध अयशस्वी झाले की, सूडबुद्धीने किंवा दबावापोटी बलात्काराचे गुन्हे दाखल केले जातात. यामुळे निर्दोष पुरुषांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. उच्च न्यायालयाने वैद्यकीय पुरावे आणि पीडितेचे वर्तन यांचा जो विचार केला आहे, तो कनिष्ठ न्यायालयांसाठी एक मार्गदर्शक ठरेल.

या निकालाचे संभाव्य परिणाम

खोट्या तक्रारींना आळा: लग्नाचे खोटे आमिष किंवा संबंध तुटल्यानंतर सूड घेण्याच्या प्रवृत्तीला या निकालामुळे चाप बसू शकतो. सज्ञान व्यक्तींची जबाबदारी: जर दोन्ही व्यक्ती सज्ञान असतील, तर त्यांच्या निर्णयांची जबाबदारीही त्यांचीच असते, हे या निकालाने अधोरेखित केले आहे.पुराव्यांचे महत्त्व: केवळ पीडितेच्या जबाबावर अवलंबून न राहता, वैद्यकीय आणि परिस्थितीजन्य पुराव्यांची सखोल तपासणी करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## रमाई आंबेडकर : संघर्ष, त्याग आणि सामाजिक क्रांतीची शांत मशाल

इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे गाजतात, तर काही व्यक्तिमत्त्वे इतिहास घडवतात. काहींची नावे सुवर्णाक्षरांनी लिहिली जातात, तर काहींचे अस्तित्वच इतिहासाला दिशा देते. रमाई आंबेडकर या दुसऱ्या प्रवाहातील व्यक्तिमत्त्व होत्या. बाबासाहेब आंबेडकरांच्या तेजस्वी विचारांच्या मागे उभी असलेली ही शांत शक्ती, सामाजिक क्रांतीची न दिसणारी पण अत्यंत निर्णायक मशाल होती. रमाई म्हणजे केवळ बाबासाहेबांची पत्नी नव्हे; त्या म्हणजे दुःखाला धैर्यात रूपांतर करणारी स्त्री, अन्यायाला सहन न करता विचारात बदल घडवणारी माता आणि दलित-वंचित समाजाच्या मुक्तीसाठी स्वतःचे आयुष्य अर्पण करणारी संघर्षयोद्धा. आज रमाई आंबेडकर जयंती साजरी करताना प्रश्न उभा राहतो, आपण रमाईंना किती समजून घेतले आहे? त्यांच्या जीवनातील त्याग, वेदना आणि संघर्षाला किती न्याय दिला आहे?

रमाईंचे बालपण म्हणजे गरिबी, उपेक्षा आणि सामाजिक अन्याय यांचे जिवंत चित्र होते. जातीय व्यवस्थेच्या बेड्या, स्त्री म्हणून दुय्यम स्थान आणि आर्थिक अभाव, या तिहेरी संकटात रमाईंचे आयुष्य घडले. परंतु या परिस्थितीने त्यांना मोडले नाही; उलट त्यांच्या मनात संघर्षाची मशाल पेटवली. बाबासाहेबांशी विवाहानंतर रमाईंचे आयुष्य अधिक कठीण झाले. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे सततचा अभ्यास, आंदोलन, प्रवास आणि सामाजिक संघर्ष. त्या संघर्षाच्या प्रत्येक टप्प्यावर रमाईंचा वाटा होता पण तो वाटा इतिहासाने फारसा नोंदवला नाही. रमाईंचा संघर्ष हा मंचावरचा नव्हता; तो घरातला होता. बाबासाहेबांच्या आंदोलनासाठी आवश्यक असलेली आर्थिक व्यवस्था सांभाळताना रमाईंनी स्वतःच्या गरजा बाजूला ठेवल्या. घरातील दागिने विकले, उपाशी राहिल्या, अपमान सहन केला; पण बाबासाहेबांच्या विचारांवर कधीही प्रश्नचिन्ह लावले नाही. त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन. मातृत्वाचा आनंद मिळण्याआधीच त्यांना संततीच्या मृत्यूचे दुःख सहन करावे लागले. एका आईसाठी यापेक्षा मोठे दुःख कोणते असू शकते? पण रमाईंनी बाबासाहेबांच्या कार्यात खंड पडू दिला नाही. त्यांच्या अश्रूंमध्येही सामाजिक क्रांतीचे स्वप्न जिवंत होते.

रमाईंचे जीवन म्हणजे एका स्त्रीच्या वेदनांचा इतिहास नाही; तो सामाजिक अन्यायाविरुद्धचा मौन बंडखोरीचा इतिहास आहे. भारतीय समाजात स्त्रीला नेहमीच सहनशीलतेचे प्रतीक मानले गेले. पण रमाईंनी सहनशीलतेला संघर्षाची दिशा दिली. त्यांनी कधीही सार्वजनिक मंचावर भाषणे दिली नाहीत; पण त्यांच्या जीवनातील प्रत्येक निर्णय हा स्त्रीस्वातंत्र्याचा घोष होता. आज स्त्री सक्षमीकरणाच्या चर्चा मोठ्या प्रमाणावर होतात पण रमाईंचे जीवन सांगते की, स्त्री सक्षमीकरण म्हणजे केवळ अधिकारांची भाषा नाही; ते त्याग, आत्मसन्मान आणि संघर्ष यांचे मिश्रण आहे. रमाई म्हणजे भारतीय स्त्रीवादी चळवळीतील दुर्लक्षित अध्याय. त्यांचे योगदान नोंदवले गेले असते, तर भारतीय स्त्रीवादी विचारांना अधिक व्यापक सामाजिक अधिष्ठान मिळाले असते. दलित चळवळ म्हणजे केवळ राजकीय आंदोलन नाही; ती मानवी प्रतिष्ठेची लढाई आहे. बाबासाहेबांनी या लढाईला वैचारिक अधिष्ठान दिले; पण त्या विचारांना भावनिक आधार रमाईंनी दिला. बाबासाहेबांच्या



आंदोलनामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. त्या विरोधाचा सामना करताना रमाईंना सामाजिक बहिष्कार, अपमान आणि उपेक्षा सहन करावी लागली. पण त्यांनी कधीही आपल्या भूमिकेत तडजोड केली नाही. दलित समाजातील महिलांसाठी रमाईंचे जीवन एक दीपस्तंभ ठरले. आज दलित चळवळीत महिलांचा वाढता सहभाग हा रमाईंच्या त्यागाचा परिणाम आहे, हे विसरता येणार नाही.

भारतीय इतिहास लेखनात स्त्रियांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिले आहे. रमाईंचे जीवन हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. बाबासाहेबांवर अनेक ग्रंथ लिहिले गेले; पण रमाईंच्या योगदानावर फारसा प्रकाश टाकला गेला नाही. हा विस्मरण केवळ ऐतिहासिक नाही; तो सामाजिक मानसिकतेचा परिणाम आहे. समाजाने नेहमीच पुरुषांच्या नेतृत्वाला महत्त्व दिले; पण त्या नेतृत्वामागील स्त्रीच्या त्यागाकडे दुर्लक्ष केले. रमाईंच्या जीवनाचा अभ्यास म्हणजे भारतीय समाजाच्या या मानसिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे होय. आज भारतीय समाजात जातीय विषमता, आर्थिक असमानता आणि स्त्रीविरोधी मानसिकता अजूनही अस्तित्वात आहे. संविधानाने समानता दिली असली तरी सामाजिक वास्तव अजूनही असमानतेने भरलेले आहे. अशा परिस्थितीत रमाईंचे जीवन आपल्याला सांगते की, क्रांती ही केवळ घोषणांनी होत नाही; तर ती त्यागातून जन्मते. ते सांगते, संघर्ष हा केवळ रस्त्यावरचा नसतो; तो घरातही असतो. ते सांगते, स्त्री ही केवळ सहकारी नसते; ती परिवर्तनाची शक्ती असते. आजची तरुण पिढी आधुनिकतेकडे झुकत आहे, पण त्या आधुनिकतेला सामाजिक न्यायाची जोड देणे आवश्यक आहे. रमाईंचे जीवन हे शिकवते की सामाजिक परिवर्तन हे दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण संघर्षातून घडते. रमाई आंबेडकर म्हणजे केवळ बाबासाहेबांच्या जीवनातील एक अध्याय नव्हे; त्या भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासातील एक अपरिहार्य शक्ती होत्या. त्यांच्या त्यागाशिवाय बाबासाहेबांचे कार्य इतके व्यापक झाले असते का, हा प्रश्न आजही समाजाला विचार करायला भाग पाडतो. रमाईंचे जीवन म्हणजे एका स्त्रीचे दुःख नाही; ती भारतीय समाजाच्या परिवर्तनाची गाथा आहे.

आज रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त आपण केवळ हार अर्पण करून थांबू नये. तर आपण स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे, आपण बाबासाहेबांचे विचार जगतो आहोत का? आपण रमाईंच्या त्यागाचा सन्मान करतो आहोत का? आपण समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवत आहोत का? जर उत्तर 'नाही' असेल, तर रमाईंची जयंती केवळ औपचारिक ठरेल. म्हणून आज गरज आहे, जातिव्यवस्थेविरुद्ध निर्भीड लढ्याची, स्त्रीदास्याविरुद्ध विचारांची, आर्थिक अन्यायाविरुद्ध संघटित संघर्षाची आणि बाबासाहेबांच्या विचारांना सामाजिक व्यवहारात उतरवण्याची. रमाईंचा खरा सन्मान म्हणजे, दलित, वंचित आणि स्त्रियांच्या स्वाभिमानासाठी उभे राहणे. रमाईंची खरी जयंती म्हणजे, समानतेचा विचार प्रत्यक्ष जीवनात उतरवणे. रमाईंची खरी श्रद्धांजली म्हणजे, अन्यायाविरुद्ध मौन तोडणे. तर चला आज आपण संकल्प करू या रमाईंच्या त्यागाला शब्द नव्हे, कृती देऊ!; बाबासाहेबांचे विचार केवळ पुस्तकात नव्हे, समाजात उतरवू!; जात, लिंग आणि वर्गाच्या भिंती पाडून समतेचा भारत घडवू! कारण रमाई आंबेडकर म्हणजे केवळ इतिहास नाही तर ती, त्या वर्तमानाची जाणीव आणि भविष्यातील दिशा आहेत.

रमाई आंबेडकर यांचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग आणि सामाजिक न्यायाची अमर गाथा. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना आपण केवळ शब्दांनी श्रद्धांजली देऊ नये; तर त्यांच्या विचारांना कृतीत उतरवण्याची प्रतिज्ञा करावी. रमाईंच्या त्यागातून प्रेरणा घेऊन बाबासाहेबांच्या विचारांनी समाज घडवू या, हीच त्यांच्या स्मृतींना खरी आदरांजली! समानता, स्वाभिमान आणि मानवतेच्या मूल्यांसाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सर्वांना क्रांतिकारी शुभेच्छा!

## सगरोळी कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ कपिल इंगळे यांना पीएच.डी. प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/बिलोली (प्रतिनिधी)** बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील संस्कृती संवर्धन मंडळ संचलित कृषी विज्ञान केंद्र (घतघ), शारदानगर येथील कृषी विद्या विभागाचे शास्त्रज्ञ कपिल शिवाजीराव इंगळे यांनी नुकतीच पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या या यशामुळे कृषी क्षेत्रात आणि सगरोळी परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

संशोधनाचा विषय आणि महत्त्व



कपिल इंगळे यांनी राजस्थानमधील झुंझुनू येथील श्री जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठातून (गगढण) आपले संशोधन पूर्ण केले. त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय नांदेड जिल्ह्यातील सोयाबीन पिकाच्या वाढीवर, उत्पादनावर आणि आर्थिक लाभांवर तण व्यवस्थापन पद्धतींचा होणारा परिणाम असा होता.

नांदेड जिल्हा हा सोयाबीनचा बालेकिल्ला मानला जातो, मात्र तणांच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात मोठी घट होते. इंगळे यांनी आपल्या संशोधनातून:

तण नियंत्रणाच्या विविध पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास केला.

पिकाच्या वाढीसाठी आणि अधिक उत्पादनासाठी कोणत्या पद्धती किफायतशीर आहेत, हे सिद्ध केले.

हे संशोधन सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी उत्पादन खर्च कमी करून नफा वाढवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

आपल्या यशाबद्दल बोलताना डॉ. कपिल इंगळे म्हणाले की, संस्कृती संवर्धन मंडळाने उपलब्ध करून दिलेले सकारात्मक शैक्षणिक वातावरण आणि सहकाऱ्यांकडून मिळालेले प्रोत्साहन यामुळेच मी हे संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण करू शकलो.

सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

या यशाबद्दल संस्कृती संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख (अण्णा) आणि कार्यकारी संचालक रोहित देशमुख यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. तसेच कृषी विज्ञान केंद्राच्या प्रमुख डॉ. माधुरी रेवणवार, केंद्रातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी आणि नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. कपिल इंगळे यांच्या या संशोधनाचा फायदा आगामी काळात मराठवाड्यातील सोयाबीन उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# छत्रपती संभाजीनगरच्या महापौरपदासाठी समीर राजूरकर, तर उपमहापौरपदासाठी राजेंद्र जंजाळ यांचे उमेदवारी अर्ज दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/शहराचे नामकरण झाल्यानंतर पहिल्यांदाच होत असलेल्या ऐतिहासिक महापौर आणि उपमहापौर निवडीसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. भारतीय जनता पार्टीकडून महापौरपदासाठी समीर राजूरकर यांनी, तर उपमहापौरपदासाठी राजेंद्र जंजाळ यांनी आज आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. पक्षाने एका सामान्य कार्यकर्त्यावर टाकलेल्या या विश्वासामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

भाजपच्या बड्या नेत्यांचा पाठिंबा

या उमेदवारीसाठी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाचा मोठा पाठिंबा लाभला आहे. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर समीर राजूरकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना पक्षाचे वरिष्ठ नेते आणि मार्गदर्शकांचे आभार मानले. यामध्ये प्रामुख्याने देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री), रवींद्र चव्हाण (प्रदेशाध्यक्ष), चंद्रशेखर बावनकुळे (महसूल मंत्री), अतुल सावे (मंत्री), डॉ. भागवत कराड (खासदार), संजय केणेकर (आमदार) व किशोर शितोळे (शहर जिल्हाध्यक्ष) या सर्व नेत्यांनी एका निष्ठावान कार्यकर्त्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्याचा संकल्प राजूरकर यांनी केला आहे.

**विकासाचे ध्येय आणि ऐतिहासिक महत्त्व**

शहराचे नाव 'छत्रपती संभाजीनगर' झाल्यानंतर ही पहिलीच महापौर निवड असल्याने या पदाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या जबाबदारीचे पालन करताना महानगरपालिकेच्या माध्यमातून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करेन, अशी ग्वाही राजूरकर यांनी यावेळी दिली. जनतेचे आशीर्वाद आणि पक्षाची साथ यामुळे हा क्षण आयुष्यातील सर्वात मोलाचा असल्याचेही त्यांनी नमूद केले.



**सत्कार नको, केवळ स्नेह असू द्या!**

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. मात्र, समीर राजूरकर यांनी एक अत्यंत कौतुकास्पद आवाहन केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, मी आपल्या अभिनंदनाचा नम्रपणे स्वीकार करतो, परंतु माझी एकच विनंती आहे- सत्कार नको, शाल, पुष्पगुच्छ किंवा पुष्पहार काहीही नको. केवळ तुमचा स्नेह आणि आशीर्वाद कायम असू द्या.

या आवाहनामुळे त्यांच्या संयमी आणि कामाप्रती असलेल्या निष्ठेची चर्चा शहरात होत आहे. आता सर्वांचे लक्ष प्रत्यक्ष निवड प्रक्रियेकडे लागले असून, छत्रपती संभाजीनगरच्या विकासाची धुरा कोणाच्या हाती जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# महाशिवरात्रीनिमित्त वेरुळ परिसरात वाहतूक बदल; भाविकांच्या सोयीसाठी पोलीस प्रशासनाचा मोठा निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** वेरुळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षी लाखो भाविकांची मांदियाळी असते. या काळात होणारी संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी १४ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत धुळे-सोलापूर महामार्गावरील वाहतुकीत महत्त्वपूर्ण बदल करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

**का करण्यात आला बदल?**

महाशिवरात्रीच्या निमित्ताने होणारी भाविकांची अलोट गर्दी आणि वाहनांची संख्या पाहता, वेरुळ आणि खुलताबाद परिसरात रस्ते अरुंद पडू शकतात. यामुळे महामार्गावरील नियमित वाहतुकीचा खोळंबा होऊ नये, यासाठी हा 'डायव्हर्जन' प्लॅन तयार करण्यात आला आहे.खुलताबाद आणि वेरुळ घाट परिसरातील गर्दी टाळण्यासाठी खालीलप्रमाणे पर्यायी मार्गांचा वापर करावा लागेल.

**कन्नड ते छत्रपती संभाजीनगर** (वेरुळ-खुलताबाद मार्गे) कन्नड वेरुळ कसाबखेडा फाटा वरझडी माळीवाडा शरणापूर फाटा छत्रपती संभाजीनगर.

**छत्रपती संभाजीनगर ते कन्नड** (दौलताबाद-खुलताबाद मार्गे) छत्रपती संभाजीनगर शरणापूर फाटा माळीवाडा वरझडी कसाबखेडा फाटा वेरुळ कन्नड.

**फुलंब्री ते कन्नड** (सुलतानपूर-खुलताबाद मार्गे) । फुलंब्री छत्रपती संभाजीनगर शरणापूर फाटा माळीवाडा वरझडी कसाबखेडा फाटा कन्नड.

हे बदल १४ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत लागू राहतील.या मार्गांवर ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, वाहनधारकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**स्थानिक वाहतूक:** या बदलांमुळे प्रवासाचा वेळ थोडा वाढू शकतो, त्यामुळे प्रवाशांनी वेळेचे नियोजन करूनच घराबाहेर पडावे.

**टीप:** दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी पार्किंगच्या नियमांचे पालन करावे, जेणेकरून मुख्य रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही.


## कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग

**छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय पदमपुरा परीसर,**
**छत्रपती संभाजीनगर - ४३१००५**

ई-मेल - aurangabad.eemahapwd.gov.in    दुरध्वनी ०२४०-२३३१०२२

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक**
**सीएटी/२०२४/प्र.क्र.१४४/इमा-२ दिनांक -२८/०२/२०२४**
**ई- निविदा सूचना क्रं. ४४८ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर (दुरध्वनी क्रमांक. ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०५) कामांकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नोंदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन / ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. १) http://mahapwd.gov.in 2) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेवसाईटवरती कळविण्यांत येईल) ३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

जिमाका/छ.स.न.जाहि/५४०/२०२५-२०२६

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**


# फुलंब्रीचा 'देवगिरी' पुन्हा धडाडणार! १५ वर्षांचा वनवास संपला; आमदार अनुराधा चव्हाण यांच्या हस्ते बॉयलर अग्निप्रदीपन

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी**/फुलंब्री तालुक्याचे आर्थिक बलस्थान असलेल्या आणि गेल्या १५ वर्षांपासून बंद अवस्थेत पडलेल्या देवगिरी सहकारी साखर कारखान्याचे बॉयलर अग्निप्रदीपन आज आमदार अनुराधा चव्हाण यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात संपन्न झाले.

या सोहळ्यामुळे फुलंब्रीच्या औद्योगिक आणि कृषी क्षेत्रात एका नव्या पर्वाची सुरुवात झाली असून, शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

दिलेला शब्द पाळला: अवघ्या वर्षभरात कारखाना सुरू

सन २०११-१२ पासून हा कारखाना बंद असल्याने परिसरातील शेतकरी आणि कामगारांचे मोठे नुकसान होत होते. अनेक निवडणुकांमध्ये हा कारखाना केवळ प्रचाराचा मुद्दा ठरला होता. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार अनुराधा चव्हाण यांनी कारखाना सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. विशेष म्हणजे, निवडून आल्यानंतर वर्षभराच्या आतच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने आणि राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा शब्द प्रत्यक्ष कृतीत उतरवला आहे.

कारखान्याच्या कार्यस्थळावर आज मुख्य प्रशासक कल्याण चव्हाण यांनी त्यांच्या पत्नीसह बॉयलरचे विधिवत पूजन केले. त्यानंतर आमदार अनुराधा चव्हाण यांच्या हस्ते अग्निप्रदीपन करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. हा क्षण फुलंब्री तालुक्यासाठी ऐतिहासिक मानला जात आहे.

या सोहळ्याला तालुक्यातील अनेक दिग्गज मंडळी उपस्थित होती, ज्यात प्रामुख्याने खालील नावांचा समावेश आहे.



अतुल चव्हाण (मुख्य अभियंता),नितीन देशमुख (प्रशासकीय संचालक),योगेश मिसाळ (प्रशासकीय संचालक तथा नगरसेवक),निखिल चव्हाण (भाजप उमेदवार, गणोरी गट),नगरसेवक गणेश राऊत, वाल्मीक जाधव, मनोज मुळे, बाबासाहेब शिनगारे, गजानन नागरे, संतोष तांदळे,याव्यतिरिक्त मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी आणि कामगार या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी उपस्थित होते. कारखाना सुरू झाल्यामुळे आता फुलंब्री आणि परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाचा प्रश्न मार्गी लागणार असून, शेकडो हातांना पुन्हा रोजगार उपलब्ध होणार आहे

# प्रशासकीय संवेदनशीलतेचे दर्शन

## सोशल मीडियावरील त्या व्हायरल व्हिडिओमुळे ७५ वर्षीय निराधाराला मिळाला 'श्रावणबाळ' योजनेचा आधार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड / प्रतिनिधी/गणेश सपकाळ** / सोशल मीडियाचा वापर जर सकारात्मक हेतूने केला आणि त्याला प्रशासकीय संवेदनशीलतेची जोड मिळाली, तर एका सामान्यातील सामान्य माणसाचे आयुष्य कसे बदलू शकते, याचा प्रत्यय अंबड तालुक्यात आला आहे. एका व्हायरल व्हिडिओमुळे मागील अनेक महिन्यांपासून शोध सुरू असलेल्या ७५ वर्षीय निराधार वृद्धेला तहसीलदार विजय चव्हाण यांच्या पुढाकारामुळे अखेर शासकीय योजनेचा लाभ मिळाला आहे.

सुमारे पाच-सहा महिन्यांपूर्वी सोशल मीडियावर एक हृदयद्रावक व्हिडिओ व्हायरल झाला होता.

यामध्ये एक वृद्ध व्यक्ती अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत असल्याचे दिसत होते. हा व्हिडिओ तहसीलदार विजय चव्हाण यांच्या पाहण्यात आला होता. मात्र, संबंधित व्यक्ती कोणत्या गावची आहे, याचा उल्लेख व्हिडिओत नसल्याने त्यांचा शोध घेणे कठीण झाले होते. तरीही, चव्हाण यांनी हार न मानता प्रशासकीय स्तरावर या वृद्ध व्यक्तीचा शोध सुरू ठेवला होता.

४ फेब्रुवारी २०२६ रोजी उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारदे यांच्या अध्यक्षतेखाली अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील पोलीस पाटलांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी तहसीलदार चव्हाण यांनी त्या व्हायरल व्हिडिओतील व्यक्तीचे वर्णन करून सर्व पोलीस पाटलांना विचारणा केली. तेव्हा जामखेड गावच्या पोलीस पाटलांनी ही व्यक्ती आपल्याच गावातील असून त्यांचे नाव एकनाथ दिवटे असल्याचे सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार, ७५ वर्षीय एकनाथ दिवटे हे पूर्णतः निराधार आहेत. चार वर्षांपूर्वी त्यांच्या मुलाचे निधन झाले, पत्नी सोबत नाही आणि स्वतःचे घरही नाही. गावातील दुकानांसमोर झाडलोट करून दुकानदार जे काही खायला देतील, त्यावर ते आपली गुजराण करत होते.माहिती मिळताच तहसीलदार चव्हाण यांनी पोलीस पाटलांना निर्देश देऊन श्री. दिवटे यांना सन्मानाने तहसील कार्यालयात आणण्यास सांगितले. ५ फेब्रुवारी रोजी जेव्हा ते कार्यालयात आले, तेव्हा त्यांची थकलेली अवस्था पाहून तहसीलदारांनी क्षणाचाही विलंब न लावता सर्व कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून घेतली. अनेक वर्षांपासून लाभापासून वंचित असलेल्या दिवटे यांच्यासाठी 'श्रावणबाळ योजना' तात्काळ मंजूर करण्यात आली. पुढील महिन्यापासून त्यांच्या खात्यात पेन्शन जमा होण्यास सुरुवात होईल.

अंबड तालुक्यात 'शुद्धता मोहीम' सुरू

या घटनेच्या निमित्ताने तहसीलदार विजय चव्हाण यांनी तालुक्यात 'संजय गांधी निराधार योजना शुद्धता मोहीम' राबवण्याचे जाहीर केले आहे. यामध्ये दोन मुख्य उद्दिष्टे आहेत:

बोगस लाभार्थींवर कारवाई: कमी वय असलेले, जास्त उत्पन्न असलेले किंवा नियमबाह्यरीत्या लाभ घेणाऱ्यांची नावे शोधून ती कमी केली जातील.

खऱ्या गरजूंचा शोध: तालुक्यातील विधवा, परित्यक्ता, दिव्यांग आणि श्री. दिवटे यांच्यासारख्या खऱ्या निराधार व्यक्तींना शोधून त्यांना योजनेत समाविष्ट केले जाईल.

एका खऱ्या गरजू व्यक्तीला प्रशासकीय मदतीचा हात देता आला, याचे मोठे समाधान आहे. तालुक्यात अजूनही असे अनेक गरजू असू शकतात, त्यांना शोधण्यासाठी आम्ही विशेष मोहीम राबवत आहोत.

**- विजय चव्हाण,**
**तहसीलदार, अंबड**

प्रशासनाचे आवाहन

जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे.

नागरिकांनी आपल्या परिसरात अशा गरजू व्यक्ती असल्यास त्यांची माहिती पोलीस पाटील, तलाठी किंवा तहसील कार्यालयात द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.

# आरोग्यपुरक उत्पादनांवर भर द्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** महिला बचत गटांनी आपली खाद्यपदार्थांचे वा कृषी उत्पन्न आधारीत उत्पादने तयार करतांना आरोग्यपुरक उत्पादनांवर भर द्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.




महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे आज समुह साधन व्यक्तिंकरीता दोन दिवसीय हवामान बदल अनुकूलन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. माविमचे जिल्हा समन्वयक चंदनसिंग राठोड, माविमचे विभागीय सल्लागार संदीप मराठे, उत्कर्ष भोळे, सुनिल पैठणे, फारह हुसेनी आदी उपस्थित होते.

समतामूलक परिवर्तन यंत्रणा उभारण्याच्या उपक्रमाचा भाग म्हणून या हवामान बदल अनुकूलन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमात ५२ प्रशिक्षणार्थी महिलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. हवामान बदलांचा परिणाम ध्यानात घेऊन तयार करावयाची उत्पादने याबाबत हे प्रशिक्षण देण्यात येत आहे. खाद्यपदार्थी निर्मितीमध्ये उत्पादन ते विक्री अशी सक्षम साखळी निर्माण करण्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, बचत गटाद्वारे उत्पादीत उत्पादनांना बाजारात चांगली मागणी असते. ही उत्पादने आरोग्यपूरक असावीत. पोषणमूल्य म्हणून बाजारात विक्री होणारी पेये, पदार्थ इत्यादींच्या उत्पादनात महिला बचत गटांनी योगदान द्यावे. त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी बाजारात साखळी निर्माण करता येईल,असेही त्यांनी सांगितले. या उत्पादनांची विक्री, त्यासाठी करावे लागणारे ब्रँडींग, त्याचे लेखे तयार करणे इ.साठी ही महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे,असे निर्देशही त्यांनी दिले.

# जैनम महिला मंचचा हळदी-कुंकू सोहळा उत्साहात संपन्न; सपना चोपडा ठरल्या 'क्वीन'

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी**/येथील जैनम महिला मंचच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हळदी-कुंकू कार्यक्रम अत्यंत जल्लोषात आणि उत्साहात पार पडला. या सोहळ्याला शहरासह ग्रामीण भागातील सुमारे ५०० महिला सदस्यांची उपस्थिती होती. यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'क्वीन' स्पर्धेत सौ. सपना चोपडा यांनी विजेतेपद पटकावत मानाचा तुरा रोवला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण 'क्वीन' स्पर्धा ठरली. एकूण २७ स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवला होता. तीन आव्हानात्मक फेऱ्यांनंतर परीक्षकांनी विजेत्यांची निवड केली. यामध्ये:

प्रथम क्रमांक (क्वीन): सौ. सपना चोपडा,द्वितीय क्रमांक: स्नेहलता ठोलिया,तृतीय क्रमांक: वंदना कांकरिया,चतुर्थ क्रमांक: भावना चोरडीया,स्पर्धे सोबतच विविध खेळांचे (गेम्स) आयोजन करण्यात आले होते. महिलांनी डान्स, गाणी आणि विनोद सादर करत कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सौ. इंदुमती निर्मलचंद पगारीया आणि आशा कासलीवाल (कन्नडवाले) यांनी प्रायोजक म्हणून मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिया काला आणि सविता लोढा यांनी अत्यंत बहारदार पद्धतीने केले, तर संगीता संचेती यांनी वर्षभरातील कामाचा आढावा सादर केला. परीक्षक म्हणून रिया फिरोदीया आणि रविना सुगंधी यांनी काम पाहिले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जैनम महिला मंचच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. यात प्रामुख्याने:

मीनल बागरेचा, प्रिया बागरेचा, शितल पारख, अक्षता साकला.रेश्मा कोठारी, राखी कोठारी, सोनल कासलीवाल, विशाखा कासलीवाल, सोनल कोठारी, प्रीती पारख याप्रसंगी भारती बागरेचा, ललिता साकला यांच्यासह सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. विशेष म्हणजे या सोहळ्यासाठी लासूर, कन्नड, वाळूज, पंढरपूर आणि कचनेर अशा विविध भागांतून महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# २५३३ रिक्त पदांसाठी ३७ नामांकित कंपन्या घेणार प्रत्यक्ष मुलाखती; सुशिक्षित बेरोजगारांना मोठी संधी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठ परिसरात 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात विविध क्षेत्रातील ३७ नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, तब्बल २५३३ रिक्त पदांसाठी प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या जाणार आहेत.

**मेळाव्याचे मुख्य तपशील-** दिनांक: बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६,वेळ: सकाळी ९:३० वाजल्यापासून स्थळ: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.

**पात्रता आणि संधी-**या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विविध शैक्षणिक पात्रता निश्चित करण्यात आली आहे. यात प्रामुख्याने १० वी आणि १२ वी उत्तीर्ण (SSC/HSC)/ आय.टी.आय. (ITI) आणि डिप्लोमा (Diploma) ,कोणत्याही शाखेचे पदवीधर (Any Graduate), इंजिनीअरिंग (Engineering) पदवीधारक असावा.

सहभागी होणाऱ्या प्रमुख कंपन्या:

या रोजगार मेळाव्यात टोयोटा किर्लोस्कर मोटर, परकिन्स इंडिया, कॉस्मो फिल्म्स, इंड्यूरन्स टेक्नॉलॉजी, संजीव ऑटो पार्ट्स, रूचा इंजिनिअर्स, एलआयसी (LIC), कल्याण ज्वेलर्स, डॉ. रेड्डी फाऊंडेशन, धूत ऑटोमोटिव्ह आणि शॉपर्स स्टॉप यांसारख्या ३७ नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत.

नोंदणी आणि सहभागाची प्रक्रिया:

उमेदवारांनी या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी खालीलपैकी एका मार्गाचा अवलंब करावा.१. ऑनलाईन अर्ज: विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर आपल्या युजर आयडी आणि पासवर्डने लॉगिन करून रिक्त पदांसाठी अर्ज करावा. २. थेट मुलाखत: ज्यांनी ऑनलाईन अर्ज केला नसेल, अशा उमेदवारांनी आपल्या बायोडाटाच्या (Resume) प्रती आणि आवश्यक कागदपत्रांसह सकाळी ९:३० वाजता मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

नोंदणी करताना किंवा अर्ज करताना काही तांत्रिक अडचण आल्यास उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

सहायक आयुक्त सुरेश बहुरे यांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त गरजू युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेऊन आपले करिअर घडवावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने केले आहे.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव

नाशिक: मुंबई विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जश्न-ए-उर्दू' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय उर्दू महोत्सवात मुक्त विद्यापीठाला या सन्मानाने गौरविण्यात आले. 'उर्दू चॅनल' या संस्थेमार्फत, 'रुट्स ऑफ काइंडनेस फाउंडेशन' आणि मुंबई विद्यापीठाचा उर्दू विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.उर्दू भाषेची गौरवशाली साहित्यिक परंपरा जतन करणे, तिचा प्रचार-प्रसार करणे आणि शैक्षणिक क्षेत्रात उर्दूच्या संवर्धनासाठी केलेल्या भरीव कामगिरीची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.विद्यापीठाच्या वतीने मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या प्रसंगी व्यासपीठावर अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होत.डॉ. कमर सिद्दिकी: संचालक, उर्दू चॅनल,डॉ. अब्दुल्ला इम्तियाज: विभागप्रमुख, उर्दू विभाग, मुंबई विद्यापीठ,प्रा. शहाब मलिक: विभागप्रमुख, उर्दू विभाग, जम्मू विद्यापीठ,प्रा. कासीम इमाम: सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमी पुरस्काराच्या मानपत्रात विद्यापीठाच्या कार्याचा विशेष गौरव करण्यात आला आहे. त्यातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे:दर्जेदार शिक्षण: विद्याशाखेतर्फे उर्दू विषयातील बी.ए. आणि एम.ए. हे शिक्षणक्रम अत्यंत प्रभावीपणे राबवले जातात.साहित्य निर्मिती: उर्दू भाषा आणि विविध साहित्य प्रकारांवर आधारित उच्च दर्जाची पाठ्यपुस्तके विद्यापीठाने तयार केली असून ती असंख्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली आहेत.सांस्कृतिक उपक्रम: सरकारी आणि निमसरकारी संस्थांच्या सहकार्याने राष्ट्रीय स्तरावर विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यापीठाने उर्दू भाषेच्या उत्थानासाठी मोलाचे कार्य केले आहे.

# जालना महानगरपालिका महापौरपदासाठी वंदना मगरे, तर उपमहापौरपदासाठी राजेश राऊत यांनी ठोकला शड्डू

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना महानगरपालिके च्या राजकीय हालचालींना आता वेग आला असून, अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी आज सत्ताधारी व महाविकास आघाडीच्या वतीने अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. महापौरपदासाठी वंदना मगरे आणि उपमहापौरपदासाठी राजेश राऊत यांनी आपले नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी तथा सह आयुक्त सुप्रिया चव्हाण यांच्याकडे सुपूर्द केले.

दिग्गजांच्या उपस्थितीत शक्तीप्रदर्शन

अर्ज दाखल करण्याप्रसंगी राजकीय नेत्यांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. यावेळी प्रामुख्याने आमदार कैलास गोरंट्याल आणि माजी आमदार भास्कर दानवे यांची उपस्थिती लक्षणीय होती. या दोन्ही नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या आगामी सत्तेचे समीकरण जुळवले जात असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.



अर्ज भरताना केवळ राजकीय नेतेच नव्हे, तर पक्षाचे अनुभवी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. यामध्ये प्रामुख्याने खालील नेत्यांचा सहभाग होता.रमेश गौरक्षक, शशिकांत घुगे, महेश निकम, विजय फुलंब्रीकर, केशव कानपुडे, बंडू चव्हाण, योगेश चव्हाण यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला होता. छायाचित्रणकार किरण खानापुरे यांनी या ऐतिहासिक क्षणांचे औचित्य साधत संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण व छायाचित्रण केले.वंदना मगरे आणि राजेश राऊत यांच्या उमेदवारीमुळे आता पालिकेतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सह आयुक्त सुप्रिया चव्हाण यांनी अर्ज स्वीकारले असून, आता छाननी आणि त्यानंतर होणाऱ्या प्रत्यक्ष निवडीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. अनुभवी नेत्यांची साथ आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता, ही निवडणूक चुरशीची होणार यात शंका नाही.

## संक्षिप्त

### अमृतच्या उद्योगविषयक प्रशिक्षणाचे आयोजन ९ फेब्रुवारीपासून होणार जालना येथे सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्ह्यातील युवक-युवती व उद्योजकांसाठी स्वयंरोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाची नवी संधी उपलब्ध करून देणारे उद्योग कौशल्यवर्धन प्रशिक्षण, लघु उद्योग प्रशिक्षण सोमवार दि.९ फेब्रुवारी २०२६ पासून जालना येथे सुरू होत आहे. तरी जालना जिल्ह्यातील नवीन उद्योग सुरु करू इच्छिणाऱ्या युवक-युवती व उद्योजकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

हाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या वतीने हा प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षणात नवीन व्यवसाय सुरू करणे तसेच चालू व्यवसायाचा विस्तार यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींवर मार्गदर्शन केले जाणार आहे. उद्योग उभारणीच्या मूलभूत संकल्पना, योग्य व्यवसाय निवड, उत्पादन प्रक्रिया, खर्च नियंत्रण, नफा व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, ब्रेडिंग व ट्रेडमार्क नोंदणी यासह शासकीय योजनांचा उद्योगासाठी प्रभावी वापर कसा करावा, याबाबत तज्ज्ञांकडून सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

डिजीटल युगाची गरज लक्षात घेऊन प्रशिक्षणार्थीना 'अमृत पेठ' या ई-कॉमर्स विक्री माध्यमाची ओळख करून देण्यात येणार असून, त्याद्वारे जालना जिल्ह्यातील लघु उद्योगांची उत्पादने संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचविण्याची संधी मिळणार आहे. यामुळे स्थानिक उद्योगांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होऊन रोजगार निर्मितीस चालना मिळेल. अमृत संस्थेच्या विविध योजनांचा लाभ खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांना घेता येणार असून, वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेले जालना जिल्ह्यातील पात्र नागरिक या प्रशिक्षणासाठी सहभागी होऊ शकतात. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) जिल्हा व्यवस्थापक नितीन खेकाळे- ७३९१०६५४७४, जिल्हा उपव्यवस्थापक चिंतेश जोशी - ९४२१९४४७५२ यांच्याशी संपर्क साधावा, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### जिल्हा कारागृहात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**जालना जिल्हा कारागृहातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह बंदीची गुरुवार दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी शिबिरात आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबीराचे आयोजन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील,डॉ.प्रदीप कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली एकुण ७५ जणांची आरोग्य तपासणी करुन औषधी वाटप करण्यात आली. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर, कारागृह अधिक्षक प्रविण विभांडीत, वैद्यकिय अधिक्षक डॉ. प्रज्ञा कुलकर्णी, डॉ. ओम ढाकणे यांच्यासह कारागृहातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. असे कळविले आहे.

### १८ फेब्रुवारी रोजी पेंशन अदालत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयातील आस्थापना उपायुक्त यांनी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निकाली काढण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानूसार पेंशन अदालत दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जालना जिल्हा परिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांच्या दालनात आयोजित करण्यात आली आहे.

आपली प्रकरणे पेंशन अदालतीमध्ये ठेवण्यासाठी सेवानिवृत्तांनी प्रलंबित प्रश्न, अर्ज, पोस्टाने, ई-मेल किंवा हस्तपोच जिल्हा परिषदेतील सामान्य प्रशासन विभागात दि.१२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत. तरी पेंशन अदालतीसाठी सेवानिवृत्तांनी, कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांनी प्रकरणाच्या माहितीसह उपस्थित रहावे, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# संस्कार प्रबोधिनीच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप; 'आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा' मान्यवरांचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/(प्रतिनिधी)** शहरातील नामांकित संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. शालेय जीवनाचा टप्पा पूर्ण करून बोर्डाच्या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी मान्यवरांनी यशस्वी जीवनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ संचालक विनायकराव मामा देशपांडे, भास्करराव काळे, आणि मुख्याध्यापक ईश्वर वाघ यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागवण्याचे काम केले.विनायकराव मामा देशपांडे: विद्यार्थ्यांनी शालांत परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे. सातत्य आणि विचारपूर्वक टाकलेले प्रत्येक पाऊल तुम्हाला यशाच्या शिखरापर्यंत घेऊन जाईल. शरीर सुदृढ ठेवल्यास मन प्रसन्न राहते आणि अशा सुदृढ मनातूनच देशसेवेचे मोठे कार्य घडू शकते.भास्करराव काळे: परीक्षेचा कोणताही ताण न घेता विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात सामोरे गेले पाहिजे.सुरेश कुलकर्णी (अध्यक्षीय समारोप): आपला स्वभाव आणि दैनंदिन सवयी आपल्या यशाची दिशा ठरवतात. महान शास्त्रज्ञ मायकेल फॅरेडे यांचे उदाहरण देत त्यांनी सांगितले की, फॅरेडे ज्याप्रमाणे दररोज वाचन आणि प्रयोग करायचे, तशाच चांगल्या सवयी विद्यार्थ्यांनी अंगीकारल्या पाहिजेत.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. वेदा ठोंबरे, ध्रुव निकम, तन्वी सोनवणे, आणि नंदिनी कल्याणकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिक्षकांचे आभार मानले आणि परीक्षेसाठी सज्ज असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक रामदास कुलकर्णी, किरण धुळे, रशीद तडवी, रेखा हिवाळे, शारदा उगले, दहिभाते, शरयू देशमुख, राजश्री भाले, राहुल घोलप, घनश्याम माळी तसेच शिक्षकेतर कर्मचारी नितेश काळे व पवन साळवे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन रेखा हिवाळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शरयू देशमुख यांनी मानले. सर्व विद्यार्थ्यांनी एकमेकांना आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

### माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांचे विकासकामांवर ठाम प्रतिपादन

**आत्ताच एक्सप्रेस/कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील पिशोर जिल्हा परिषद गटातील कै. महर्षी रायभान जाधव विकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पिशोर येथे भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, संपूर्ण परिसर 'हर्षवर्धन जाधव तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा घोषणांनी दणाणून गेला होता.

या सभेमध्ये पिशोर जिल्हा परिषद गटाचे उमेदवार संजय भिकनराव निकम उर्फ (आबा), निंभोरा पंचायत समिती गणाच्या उमेदवार सविता गणेश घुगे आणि पिशोर पंचायत समिती गणाच्या उमेदवार कैकाशा युसूफ पठाण यांच्या विजयाचा निर्धार करण्यात आला.विकासकामांचा घेतला आढावा: सभेचे प्रमुख वक्ते माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी आपल्या भाषणातून गेल्या दहा वर्षांत केलेल्या विकासकामांचा पाढा वाचला. ते म्हणाले की, तालुक्यातील रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी मी नेहमीच लोकहिताला प्राधान्य दिले आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असून, रायभान जाधव विकास आघाडीचे उमेदवार निवडून आल्यास सर्वसामान्यांच्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल.विजयी करण्याचे आवाहन: यावेळी उबाठा पक्षाचे विलास पवार यांनीही जनतेला संबोधित केले. ते म्हणाले की, ही आघाडी विकास आणि विश्वासाचे प्रतीक आहे. येत्या ७ फेब्रुवारी रोजी 'ट्रॅक्टर' आणि 'कपाट' या चिन्हासमोरील बटण दाबून उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.या सभेला परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या सांगता प्रसंगी पुन्हा एकदा ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानात आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन करण्यात आले. पिशोर परिसरातील या उत्साहामुळे उमेदवारांच्या गोटात आनंदाचे वातावरण आहे.

# मध्यरात्री 'एलसीबी'चा थरार: पाचोड परिसरात गावठी कट्ट्यासह तरुण जेरबंद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** जिल्ह्यात आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक-२०२६ चे वारे वाहू लागले आहेत.

या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी अवैध हत्यारे बाळगणाऱ्यांविरुद्ध कडक पावले उचलण्याचे आदेश दिले आहेत. याच मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने रोहिलागड फाटा परिसरात मध्यरात्री पावणे एकच्या सुमारास झडप घालून एका सराईत तरुणाला बेड्या ठोकल्या.

दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ च्या रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे आणि त्यांचे पथक पाचोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. यावेळी एका गोपनीय बातमीदाराने माहिती दिली की, रोहिलागड फाटा परिसरात एक तरुण संशयास्पद रित्या वावरत असून त्याच्याकडे घातक शस्त्र आहे. मिळालेल्या माहितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ या भागात सापळा रचला. मध्यरात्री ००:४५ वाजता वर्णनाप्रमाणे एक तरुण पोलिसांना दिसला.

पोलिसांची चाहूल लागताच त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र सतर्क पथकाने झडप घालून त्याला ताब्यात घेतले.

संशयित आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला खोचलेला कथ्या रंगाची मूठ असलेला एक गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसे पोलिसांना आढळून आली. ही शस्त्रे कोणत्याही परवान्याशिवाय बेकायदेशीरपणे बाळगल्याचे निष्पन्न झाले.

आरोपीची ओळख विशाल लहु पालवे (वय २५ वर्षे),राहणार: देशगव्हान, ता. अंबड, जि. जालना.,जप्त मुद्देमाल: गावठी कट्टा व २ काडतुसे (किंमत अंदाजे ४२,००० रुपये)

याप्रकरणी पाचोड पोलीस ठाण्यात आरोपी विशाल पालवे विरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३ आणि २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा कट्टा त्याने कोठून आणला आणि त्याचा वापर तो कोणावर करणार होता, याचा अधिक तपास पाचोड पोलीस करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विजयसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पवन इंगळे, पोलीस अंमलदार सचिन राठोड, विष्णू गायकवाड, सुनील गोरे आणि योगेश तरमळे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

निवडणूक काळात शांतता भंग करणाऱ्या आणि अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगारांची गय केली जाणार नाही.

### 'तुटपुंज्या मानधनावरील वेठबिगारी थांबवा!' - सर्वोच्च न्यायालयाचा शिक्षकांच्या बाजूने ऐतिहासिक निकाल

आत्ताच एक्सप्रेस

नवी दिल्ली/मुंबई/दशकांहून अधिक काळ तुटपुंज्या पगारावर राबवून घेणे ही एक प्रकारची 'आधुनिक वेठबिगारी' आहे, अशा कडक शब्दांत ओढलेले ताशेरे आणि शिक्षकांच्या मानधनात थेट १० हजार रुपयांची वाढ करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सध्या देशभर चर्चेचा विषय ठरत आहे. उत्तर प्रदेशातील शिक्षकांच्या संदर्भात आलेल्या या निकालाचे पडसाद आता महाराष्ट्रातही उमटू लागले असून, यामुळे राज्यातील 'शिक्षण सेवक' आणि कंत्राटी शिक्षकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

उत्तर प्रदेशात 'समग्र शिक्षा' अभियानांतर्गत २०१३ पासून शारीरिक शिक्षण आणि कला विषयांच्या निदेशकांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात आली होती.

सुरुवातीचे मानधन: दरमहा केवळ ७,००० रुपये.

मंजूर वाढ: २०१७-१८ मध्ये हे मानधन १७,००० रुपये करण्यास केंद्राच्या प्रकल्प मंजुरी मंडळाने मान्यता दिली होती.

सरकारची आडमुठी भूमिका: केंद्राने मंजुरी देऊनही राज्य सरकारने शिक्षकांना १७,००० रुपये देण्यास नकार दिला आणि २०१९ मध्ये पुन्हा ७,००० रुपयांवर आणले.

या अन्यायाविरुद्ध शिक्षकांनी न्यायालयीन लढा पुकारला होता, ज्यावर न्यायमूर्ती पंकज मिथल आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला.न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण आणि 'पे अँड रिकव्हर' तत्व राज्य सरकारने निधीची कमतरता आणि केंद्राकडून ६०% वाटा न मिळणे अशी कारणे न्यायालयासमोर मांडली होती. मात्र न्यायालयाने ती फेटाळून लावताना काही कडक निर्देश दिले.वेठबिगारीची व्याख्या: महागाईच्या काळात १०-१० वर्षे केवळ ७,००० रुपयांवर काम करून घेणे हे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २३ (वेठबिगारी प्रतिबंध) चे उल्लंघन आहे.सरकारची जबाबदारी: निधीची विभागणी ही केंद्र आणि राज्य सरकारमधील प्रशासकीय बाब आहे. त्या कारणावरून कर्मचाऱ्यांचे मानधन रोखता येणार नाही.पे अँड रिकव्हर (आधी द्या, मग वसूल करा): राज्याने आधी शिक्षकांना पूर्ण मानधन (१७,००० रु.) द्यावे आणि नंतर केंद्राकडून त्यांचा हिस्सा वसूल करावा.कायदेतज्ज्ञ महेश एस. धन्नावत (कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन) यांच्या मते, हा निकाल महाराष्ट्रासाठी 'मैलचा दगड' ठरेल.शिक्षण सेवकांना दिलासा: महाराष्ट्रातही हजारो शिक्षक 'शिक्षण सेवक' म्हणून अत्यल्प मानधनावर काम करत आहेत.

# जालन्याच्या योगेश उरदुखे यांच्या 'फंगल स्पोर डिटेक्टर'ला राज्यस्तरीय 'आविष्कार' पुरस्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**संशोधन क्षेत्रात जालन्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. स्थानिक जेईएस महाविद्यालयाचे (गएड उेश्रश्रशसश) पी.एचडी. संशोधक विद्यार्थी योगेश उरदुखे यांनी राज्यस्तरीय आंतर-विद्यापीठ संशोधन परिषद 'अविष्कार'मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. त्यांनी विकसित केलेल्या 'पोर्टेबल फंगल स्पोर डिटेक्शन डिव्हाइस' (झॅोीींरलश्रश त्रीपसरश्र डॅोशि ऊशींशलींळेप ऊशींळलश) या उपकरणाला राज्य स्तरावर प्राईज फॉर इनोव्हेशन देऊन गौरवण्यात आले.

**परभणीत रंगला संशोधकांचा महाकुंभ**

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे १८ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय आंतर-विद्यापीठ संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातील २६ विद्यापीठांमधून हजारो विद्यार्थ्यांनी आपली नाविन्यपूर्ण मॉडेल्स सादर केली होती. योगेश उरदुखे यांनी 'शेती आणि पशुसंवर्धन' या अत्यंत चुरशीच्या श्रेणीत आपले संशोधन सादर केले होते.

काय आहे हे उपकरण?

शेतकऱ्यांसमोर सध्या बुरशीजन्य रोगांचे मोठे आव्हान आहे. वनस्पतींवरील बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव सुरुवातीच्या काळात ओळखणे कठीण असते, ज्यामुळे पिकांचे अतोनात नुकसान होते. योगेश यांनी तयार केलेले हे 'पोर्टेबल' उपकरण पिकांवरील बुरशीचे कण (Spores) अत्यंत अचूकपणे शोधून काढते. यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वेळेत ओळखता येईल. कीटकनाशकांचा अनावश्यक वापर टाळता येईल.शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होऊन खर्चात बचत होईल.

योगेश यांच्या या यशामागे त्यांच्या मार्गदर्शकांचे मोठे योगदान आहे. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उमेश मोगले, प्रा. डॉ. गणेश कुलकर्णी, आणि आविष्कार समितीचे समन्वयक डॉ. राजेश सरकटे यांनी त्यांना तांत्रिक आणि संशोधनात्मक सहकार्य केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया, सचिव श्रीनिवासजी भक्कड, आणि प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी योगेशचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी विज्ञानाचा वापर करा - योगेश उरदुखे



आपल्या यशाचे गमक सांगताना योगेश उरदुखे भावूक झाले. ते म्हणाले, हे यश माझ्या एकट्याचे नसून माझ्या संपूर्ण विभागाचे आणि मार्गदर्शकांचे आहे. संशोधनाच्या वाटेवर अनेक अडथळे येतात, पण सातत्य महत्त्वाचे आहे. आजच्या तरुणांनी केवळ पदव्या मिळवण्यासाठी शिक्षण न घेता, 'आऊट ऑफ द बॉक्स' विचार करून समाजाच्या, विशेषतः बळीराजाच्या समस्या सोडवण्यासाठी विज्ञानाचा वापर करावा. जिद्द असेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थीही जागतिक दर्जाचे काम करू शकतात.योगेश यांच्या या यशाबद्दल जिल्हाभरातून आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जालन्यात लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**जिल्हा परिषद बांधकाम विभागातील कथित भ्रष्टाचाराचे वाभाडे काढणाऱ्या पत्रकाराचा आवाज दाबण्यासाठी आता सत्ता आणि पैशाच्या जोरावर 'दबावतंत्राचा' वापर सुरू झाला आहे. माहिती विचारणाऱ्या पत्रकारावरच चक्क 'शासकीय कामात अडथळा' आणल्याचा आरोप करत तक्रार दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, तक्रारदार हा स्वतः शासकीय कर्मचारी नसून एका गुत्तेदाराचा भाऊ आहे. या प्रकारामुळे जालन्यातील पत्रकार वर्तुळात तीव्र संताप व्यक्त होत असून, हा लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर थेट हल्ला असल्याचे मानले जात आहे.

सूडबुद्धीने केलेली 'प्रतितक्रार'?

या प्रकरणातील घटनाक्रम पाहिला असता हा सर्व प्रकार सूडबुद्धीने रचलेला कट असल्याचे स्पष्ट होते. १. पहिली तक्रार: संबंधित पत्रकाराने ४ दिवसांपूर्वीच गुत्तेदाराच्या भावाविरोधात कदीम जालना पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. यात बातमीच्या संदर्भात माहिती विचारली असता गुत्तेदाराने आणि त्याच्या भावाने जीवे मारण्याची धमकी व शिवीगाळ केल्याचा आरोप केला होता. २. दुसरी तक्रार (प्रतितक्रार): या तक्रारीला उत्तर म्हणून आणि पत्रकाराला कायदेशीर कचाट्यात अडकवण्यासाठी ४ दिवसांनंतर गुत्तेदाराच्या भावाने 'शासकीय कामात अडथळा' आणल्याची तक्रार दिली.

प्रश्न हा उपस्थित होतो की, ज्याने स्वतः धमकी दिली, तोच आता तक्रारदार कसा बनला?

तक्रारदाराने पत्रकारावर 'शासकीय कामात अडथळा' आणल्याचा गंभीर आरोप केला आहे. मात्र, कायद्याच्या भाषेत:शासकीय गुत्तेदार हा 'लोकसेवक' नसतो.गुत्तेदाराचा भाऊ तर कोणत्याही अधिकृत पदावर नाही. अशा स्थितीत, एका खाजगी व्यक्तीच्या कामात व्यत्यय येणे म्हणजे 'शासकीय कामात अडथळा' कसा होऊ शकतो?

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813